विद्याविकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/१४४ मुदतवाढ दिनांक : ३१/०७/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मान्यताप्राप्त शिक्षकांमधून विद्यार्थी विकास मंडळ विभाग/जिल्हा स्तर समन्वयक नामांकन प्रस्तावास मुदत वाढ.

संदर्भ : या विभागाचे विविमं/२०२६–२७/०९६, दि. १४/०६/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळांतर्गत पुणे, अहिल्यानगर व नाशिक अशा तीन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात ग्रामीण–शहर–महापालिका क्षेत्र/तालुका/विभाग/जिल्हा यास्तरावर कामकाजाच्यादृष्टीने समन्वयक पदाची जबाबदारी देऊन कामकाज सोपविणेबाबत नामांकन करण्यात येणार आहे. सदर जबाबदारीच्यादृष्टीने इच्छुक व पात्र विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांमधून; विद्यार्थी कल्याण अधिकारी कामकाज, सांस्कृतिक– सहशैक्षणिक–उपशैक्षणिक–विस्तार कार्यक्रम, कल्याणकारी योजना व उपक्रम तसेच इतर पूरक कामकाजाचा अनुभव विशेषत्वाने विचारात घेऊन नामांकन करणे प्रस्तावित आहे.

त्यानुसार उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेत पूर्व अथवा सद्यस्थितित कार्यरत विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून अनुभवधारक व या समन्वयक पदाकरिता इच्छुक व पात्र शिक्षकांस शुक्रवार दिनांक ३१ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने नामित करून ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव या विभागाकडे एका प्रतीत जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

सदर प्रस्ताव भरण्याची व पाठविण्याची मुदत वाढविण्यात येत असून विभाग/जिल्हा स्तर समन्वयक यांचे नामांकन (www. unipune.ac.in –BOD - BOD Online – Login–Online Services – Students Developement- **समन्वयक नामांकन प्रस्ताव**) येथे **शनिवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरावेत. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी असलेला प्रस्ताव विहित ठिकाणी अपलोड (Upload) करावा. मा. प्राचार्य/संचालक आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेले आणि आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केलेल्या प्रस्तावाची एक प्रत बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२६ पर्यंत एका प्रतीत प्रत्यक्ष जमा करावेत**. सदर प्रस्तावांची मूळ प्रत या कार्यालयात जमा करणे अनिवार्य असून त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे प्रत्यक्ष प्राप्त होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

वरील मुदत वाढीबाबत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व संपर्कासाठी** : (०२०–७१५३३६३३)
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०